दिनांक २८.१०.२०२५ रोजी –

अभियोग पक्षाचा सा.क्र.१ श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर उलटतपासणी आरोपी क्र.५, ६ व ७ करीता विद्वान विधिज्ञ श्री. चव्हाण एस.आर. यांच्यातर्फे शपथेवर सुरु ...

८२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.५ अनिल बाबुराव क्षिरसागर, आरोपी क्र.६ मनिषा अनिल क्षिरसागर व आरोपी क्र.७ हितेश आनंदा शार्दुल हे विभागीय क्रिडा संकुल समिती औरंगाबाद येथे किंवा विभागीय उपसंचालक कार्यालय क्रिडा व युवक सेवा छत्रपती संभाजीनगर विभाग येथे कंत्राटी किंवा कायमस्वरुपी कर्मचारी म्हणुन कधीही नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देतेवेळी मी आरोपी क्र.५, ६ व ७ यांचे नाव सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, हे आरोपी विभागीय क्रिडा संकुल समिती औरंगाबाद येथे किंवा विभागीय उपसंचालक कार्यालय क्रिडा व युवक सेवा छत्रपती संभाजीनगर विभाग येथे कामाला नसल्यामुळे तेथे किती निधी येतो किंवा कसे हे त्यांना माहिती नाही. मी फिर्याद दाखल केल्यानंतर आरोपी क्र.५ ते ७ यांच्याबाबत त्यांना आरोपी करण्यासाठी तपासी अधिकारी यांना काहीही लेखी दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.५ ते ७ हे आमच्याकडे कार्यालयात नोकरीला नसल्यामुळे त्यांचा आमच्या कार्यालयाशी कोणताही आर्थिक संबंध येत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.५ ते ७ यांना पोलीसांनी आरोपी कसे केले याबाबत मला काहीही माहिती नाही. मी पोलीसांना आरोपी क्र.५ ते ७ यांना आरोपी करा असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना सांगितलेले नसतांना देखील तपासी अंमलदाराने या प्रकरणात काही आरोपींना आरोपी केलेले आहे. हे मला सांगता येणार नाही की, सदर प्रकरणात तपासी अंमलदाराने त्यांच्या मनाला वाटेल त्यांना आरोपी केलेले आहे. हे मी सांगु शकणार नाही की, तपासी अंमलदाराने मला ब–याचशा गोष्टी माहिती नाही अशा केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद दिलेपासुन ते तपास पुर्ण होईपर्यंत आरोपी क्र.५ ते ७ यांना आरोपी करा असे लिखीत स्वरुपात दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.५ ते ७ यांनी काय केले त्याबाबत लिखीत स्वरुपात मी तपासी अंमलदाराला दिलेले नाही. मी आरोपी क्र.५ ते ७ यांच्याबाबत तपासी अंमलदाराला तोंडी काय सांगितले आणि तपासी अंमलदाराने ते त्यांच्या टिपणामध्ये लिखीत स्वरुपात नोंदवुन घेतले असे काही झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासी अंमलदाराला मी आरोपी क्र.५ ते ७ यांना आरोपी करा असे तोंडी सांगितले व ते त्यांनी लिखीत स्वरुपात नोंदवुन घेतले, असे काही झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तपासी अंमलदाराला आरोपी क्र.५ ते ७ यांनी काय केले याबाबत काही लेखी दिलेले नाही. मी तपासी अंमलदाराला आरोपी क्र.५ ते ७ यांनी काय केले ते तोंडी सांगितले व ते त्यांनी लिखीत स्वरुपात लिहुन घेतले असे काही झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.५ ते ७ यांचा या प्रकरणाशी काहीही संबंध नसतांना तपासी अंमलदाराने त्यांना खोटे आरोपी केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात आरोपी क्र.५ ते ७ यांच्याबाबत जी काही कथने केली ती खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, या

प्रकरणाशी अथवा घटनेशी आरोपी क्र.५ ते ७ यांचा काहीही संबंध नसतांना त्यांना गोवण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र.५, ६ व ७ करिता उलटतपास संपला.**

समक्ष
RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2025.10.28 17:17:49 +0530
**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
**दिनांक - २८/१०/२०२५**

श्रवणोत्तर स्वीकृती.
RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2025.10.28 17:17:55 +0530
**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

**दिनांक २८.१०.२०२५ रोजी -**

**अभियोग पक्षाचा सा.क्र.१ श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर उलटतपासणी आरोपी क्र.१० व ११ करीता विद्वान श्री. घाणेकर एन.एस. यांच्यातर्फे शपथेवर सुरु ...**

८३. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात मला जेवढी माहिती होती त्याआधारे मी प्रथम खबर दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम खबरमध्ये आरोपी क्र.१० व ११ यांचे नावही नाही व त्यांचा संबंधही नाही.

८४. हे म्हणणे खरे आहे की, स्वप्नील तांगडे याची खेळाडु कोटयामधुन आमच्या कार्यालयात प्रथम खबर तारखेच्या सहा वर्षे अगोदर नियुक्ती करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, स्वप्नील तांगडे हा आंतरराष्ट्रीय खेळाडु व शिवछत्रपती पुरस्कार विजेता आहे. हे म्हणणे खरे आहे की, स्वप्नील तांगडे हे तलवारीबाजीचे प्रशिक्षण हे खेळाडुंना सकाळ व संध्याकाळ देत असतात. हे म्हणणे खरे आहे की, स्वप्नील तांगडे यांनी दरमहिन्याचे बँकेचे स्टेटमेन्ट तपासणे आवश्यक होते हे दाखवणारा कोणताही कागद मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, स्वप्नील तांगडे यांना दरमहा बँकेचे स्टेटमेंट देण्यात येत होते हे दाखवणारा कागद मी पाहिलेला नाही व तसा कागदही नाही.

८५. मी या प्रकरणातील रोकड वही पाहिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, स्वप्नील तांगडे याची रोकड वहीवर कोणतीही सही अथवा नाव नाही.

**आरोपी क्र.१० व ११ करिता उलटतपास संपला.**

समक्ष
RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2025.10.28 17:18:05 +0530
**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
**दिनांक - २८/१०/२०२५**

श्रवणोत्तर स्वीकृती.
RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2025.10.28 17:18:37 +0530
**( श्री. आर. एस. जांबोटकर )**
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद